महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**
3 May 2017

आमचा आवाज

# खाडीपात्राबाबत अनास्था

**प्रक्रिया न केलेले सांडपाणी, डेब्रिजचा भराव, खाडी पात्र वळवणे, मार्गात बांध टाकणे आदी विविध बाबी खाडीसह त्यातील जैवविविधतेला धोकादायक आहेत. मात्र याबाबत सरकारी यंत्रणांचे बोटचेपी धोरण आणि सतत होणारी खाडीपात्राचे प्रदूषण या भागाला दलदलीचे स्वरूप निर्माण करेल, हा धोकाही आ वासून उभा आहे. खाडीच्या या प्रदूषणाला नक्की कोण जबाबदार आहे, याबाबत पर्यावरणप्रेमींनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.**

## ताळमेळ नाही



प्रदूषण नियंत्रण ही कोणा एका सरकारी संस्थेची जबाबदारी नाही. सर्वच संस्थांनी मिळून उपलब्ध यंत्रणेचा नियोजनपूर्वक वापर केला, तरच चित्र पालटू शकते. परंतु तसे न करता एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याची अधिकाऱ्यांची वृत्तीच या परिस्थितीला कारणीभूत असून हे चित्र धोकादायक आहे. **- रोहित जोशी**

## यंत्रणांची समिती नेमावी



सर्वच राजकीय पक्षांना विनंती आहे की, नवीन घोषणा, प्रकल्प आदींच्या घोषणा थांबवा. पुढील २५ वर्षांच्या दृष्टीने एक आराखडा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयार करा. महानगरपालिका, राज्य सरकार, पर्यावरण तज्ज्ञ आदींची एक समिती या प्रश्नी असावी. समितीला दोषींना तात्काळ शिक्षा देण्याचे अधिकार द्या. **- निलेश आंबेरकर**

## सांडपाण्यावर प्रक्रिया आवश्यक



खाडीपात्रात सांडपाणी सोडण्याआधी त्यावर प्रक्रिया होणे आवश्यक आहे. तसेच खाडी पात्रातील खारफुटीची वाढ आदींवर लक्ष ठेवण्यासाठी जैवविविधतेविषयक अभ्यास असलेली समिती नेमा. त्यासोबतच खाडीची बेसुमार वाढ रोखण्यासाठी समितीने काम करणे आवश्यक आहे.

**- अपूर्वा आगवण**

## धोक्याची घंटा



बांधकाम व्यावसायिक डेब्रिज टाकून खाडीपात्राची धूप करतात. त्यामुळे आक्रसणारे खाडीपात्र भविष्यातील धोक्याची घंटा आहे. मुंब्रा, कोपर रोड भागातही चाळीचे बांधकाम करण्यासाठी खाडीपात्र बुजवले जाते. त्यातून खारफुटीची वाढ होऊन गाळ साचत असून पावसात या भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. **- निलेश भणगे**

## यंत्रणांनी सतर्क व्हावे



खाडी पात्रातील खारफुटीची बेसुमार वाढ जैवविविधतेच्या साखळीला धोका निर्माण करू शकते. त्यामुळे सरकारी यंत्रणांनी सतर्क होऊन या बाबीकडे लक्ष पुरवावे. तसेच खाडीपात्रात दलदल निर्माण न होण्यासाठी प्रयत्न करावेत.

**- स्वप्नील पवार**